RXM

# 2011

# २०११

## Paper – I

## पेपर क्रमांक : १

## Civil Procedure Code, Transfer of Property Act, Specific Relief Act, Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act

## सिव्हील प्रोसिजर कोड, ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट, लॉ ऑफ कॉन्ट्रक्टस, सेल ऑफ गुडस ॲक्ट व पार्टनरशिप ॲक्ट

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**

**वेळ : ३ तास** | **गुण : १००**

**N.B. :**

**सूचना :**

*(1) All questions are **compulsory**.*

*(१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*

*(2) Question No. 1 carries **20** marks. **All** other questions carry **equal** marks i.e. **16** marks **each**.*

*(२) प्रश्न क्रमांक १ ला २० गुण असून उर्वरीत **सर्व** प्रश्नांना समान म्हणजेच १६ गुण आहेत.*

*(3) Your answers must be to the point, wherever possible quoting the specific provisions of law.*

*(३) उत्तरे मुद्देसुद असावीत. आवश्यक तेथे कायद्यातील तरतुदी नमूद कराव्यात.*

*(4) Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*

*(४) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करुन उत्तर लिहावे.*

*(5) Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*

*(५) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरीत अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

SEAL

P.T.O.

*(6) "Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised".*

*(६) उदाहरणादाखल दिलेल्या प्रकरणाशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

*(7) English version of the question shall be authentic in case of any type of any ambiguity.*

*(७) कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, इंग्रजी भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

*(8) **All** questions can be attempted only in **one** language either in **English** or in **Marathi** as per option given in the application form.*

*(८) उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार **सर्व** प्रश्नांची उत्तरे **मराठी** किंवा **इंग्रजी** यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

---

1. Write a Judgement on the basis of the facts narrated below :

खाली नमूद केलेल्या कथनावरुन न्यायनिर्णय लिहा :

While writing Judgement :

a) Adhere to the contents of Judgement as required under the code of civil procedure.

b) Frame and answer the issues properly.

c) Wherever necessary, fill up details from your imagination.

d) Give legal, logical and proper reasons for your findings.

e) Conclude the Judgement with a proper operative order.

न्यायनिर्णय लिहिताना :

अ) दिवाणी आचार संहितेमध्ये अभिप्रेत असलेल्या मसूद्याचे पालन करा.

ब) योग्य ते मुद्दे काढा आणि त्यांची योग्य ते उत्तरे लिहा.

क) जरुरीप्रमाणे तुमच्या कल्पनाशक्तीनुसार तपशील द्या.

ड) तुमच्या निष्कर्षांच्या पुष्ट्यर्थ तर्कसंगत, कायदेशीर व योग्य कारणे द्या.

इ) योग्य तो अंतिम आदेश लिहून न्यायनिर्णयाचा शेवट करा.

## Averments in the Plaint

Plaintiff claims that he is the owner and possessor of the agricultural land bearing Survey no. 66 admeasuring 5 Acres and 20 Ares situated at Thane. It is his ancestral property. Defendant's land bearing Survey no. 65 adm. 3 Acres and 5 Ares is situated on western side of his land. Defendant has no concern of whatsoever nature in the suit land. However, recently when Plaintiff got the suit land measured, it was noticed that Defendant has committed encroachment in the suit land to the extent of 1 Acre and 5 Ares from western side. Plaintiff called upon the Defendant to remove the encroachment but defendant refused to do so. Hence Plaintiff is constrained to file this suit for removal of encroachment and delivery of possession of encroached portion.

## Averments in the Written Statement

Defendant denied Plaintiff's suit in toto and contended interalia that the alleged encroached portion is the part and parcel of his land bearing Survey no. 65. He is the lawful owner and in possession of the same for the last more than 50 years. There is no question of his committing encroachment on Plaintiff's suit land. Hence Plaintiff cannot be entitled to its possession.

In the alternate, defendant states that for the last more than 50 years he is in continuous, open and peaceful possession of the alleged encroached portion in the suit land, to the knowledge of the plaintiff he has become owner by way of adverse possession. Plaintiff's suit is thus barred by limitation. Hence on this ground also Plaintiff's suit is liable to be dismissed with costs.

## वादपत्रातील कथने

वादीचे असे म्हणजे आहे की, ठाणे येथील सर्व्हे नं. ६६ एकूण ५ एकर २० आर या शेतजमीनीचा तो मालक व कब्जेदार आहे. ही त्याची वडिलोपार्जित मिळकत आहे. प्रतिवादीची जमीन सर्व्हे नं. ६५ एकूण ३ एकर ५ आर ही वादीचे दावामिळकतीच्या पश्चिमेस आहे. प्रतिवादीचा दावामिळकतीत कसल्याहि प्रकारचा संबंध नाही. असे असूनही अलीकडे जेंव्हा वादीने दावामिळकतीची मोजणी करुन घेतली तेंव्हा असे आढळून आले की प्रतिवादीने पश्चिमेकडून दावामिळकतीत १ एकर ५ आर इतके अतिक्रमण केलेले आहे. वादीने प्रतिवादीस हे अतिक्रमण काढून घेण्यास सांगितले तेंव्हा प्रतिवादीने नकार दिला. म्हणून वादीस प्रस्तुतचा दावा हा हे अतिक्रमण काढून अतिक्रमित जमिनीचा ताबा मिळणेसाठी दाखल करणे भाग पडले आहे.

## कैफियती मधील कथने

प्रतिवादीने वादीचा दावा पूर्णपणे नाकारला असून असे म्हटले आहे की तथाकथित अतिक्रमित जमीन ही प्रतिवादीची जमीन सर्व्हे नं. ६५ चाच अविभाज्य भाग आहे. तो या जमिनीचा गेली ५० वर्षांहून अधिक काळ मालक व कब्जेदार आहे. त्यामुळे त्याने वादीचे जमिनीवर अतिक्रमण करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

वैकल्पिकरीत्या प्रतिवादीचे असेही म्हणणे आहे की, ज्याअर्थी गेली ५० हून अधिक वर्षे तो या तथाकथित अतिक्रमित जागेच्या ताब्यात अव्याहतपणे, उघडपणे आणि शांततेने वादीच्या माहितीत आहे, त्या अर्थी विरुद्ध ताब्याने ही तो मिळकतीचा मालक झालेला आहे. वादीच्या दाव्याला मुदतीच्या कायद्याचा ही बाध येतो. या कारणावरुनही वादीचा दावा खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे.

---

2. Answer **any two** of the following sub-questions :

खालीलपैकी कोणत्याही **दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

a) Discuss the statement "courts shall have jurisdiction to try all suits of a civil nature".

अ) ''न्यायालयांना दिवाणी स्वरूपाच्या सर्व दाव्यांची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असेल'' या विधानाची चर्चा करा.

b) Discuss provisions relating to suits by or against minors.

ब) अज्ञान व्यक्तिने वा अज्ञान व्यक्ति विरुद्ध दावे दाखल करण्या संबंधीच्या तरतूदींची चर्चा करा.

c) Discuss whether Rejection and Return of Plaint is one and same. If yes, in which ways ? If not, in which ways ?

क) वादपत्र फेटाळणे आणि वादपत्र परत करणे हे एकच आहे का ? असल्यास कशा प्रकारे ? नसल्यास कशा प्रकारे, याची चर्चा करा.

---

3. Write short notes on **any four** of the following :

खालीलपैकी कोणत्याही **चार** संदर्भात टिपा लिहा :

a) Foreign Judgements - presumptions and conclusiveness.

अ) परदेशी न्यायनिर्णय – गृहितके आणि निर्णायकक्षमता.

b) Difference between Reference, Review and Revision.

ब) न्यायनिर्णयाचे निर्देशन, पुनर्निरीक्षण, पुनर्विलोकन यामधील फरक.

c) Execution of Decree for Partition.

क) वाटपाच्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी.

d) Relations of partners interse.

ड) भागीदारांचे परस्परांशी संबंध.

e) Conditions and warranties.

इ) अटी आणि आश्वासने.

4. Answer **any two** of the following sub-questions.

खालीलपैकी कोणत्याही **दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा.

a) Discuss the statement "Jurisdiction to decree specific performance of contract is discretionary".

अ) ''विशिष्ठ पूर्ततेचा हुकुमनामा देण्याची न्यायाधिकार कक्षा मर्जीनुसार आहे'' या विधानाची चर्चा करा.

b) Discuss provisions relating to temporary and perpetual Injunctions.

ब) तात्पुरत्या आणि कायमच्या मनाई हुकुमा बाबतच्या तरतूदींची चर्चा करा.

c) Discuss difference between suit for possession of immoveable property based on title and based on previous possession.

क) अचल मिळकतीचा ताबा मागण्यासाठी मालकी हक्कावर आधारित आणि पूर्व ताब्यावर आधारित या दोन्ही दाव्यांमधील फरकांची चर्चा करा.

---

5. Answer **any two** of the following sub-questions :

खालीलपैकी कोणत्याही **दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

a) Discuss the statement "All agreements are not contracts but all contracts are agreements".

अ) ''सगळे करारनामे करार नसतात परंतु सगळे करार करारनामे असतात'' या विधानाची चर्चा करा.

b) Discuss difference between "Indemnity and Guarantee" and "Bailment and Pledge".

ब) ''क्षतिपूर्ती आणि हमी'' तसेच ''जमानत आणि तारण'' या मधील फरकांची चर्चा करा.

c) Discuss provisions relating to performance of Reciprocal promises.

क) परस्पर अभिवचनांचे पालन करण्याच्या संबंधातील तरतूदींची चर्चा करा.

6. Answer **any two** of the following sub-questions :

खालीलपैकी कोणत्याही **दोन** उप-प्रश्नांची उत्तरे लिहा :

a) Discuss the modes by which transfer of property takes place by acts of the parties.

अ) पक्षकारांच्या कृतीद्वारे विविध प्रकारे होणाऱ्या मालमत्ता हस्तांतरणा विषयी चर्चा करा.

b) Elaborate on your understanding of the statement, " Once a mortgage always a mortgage".

ब) ''एकदा गहाणाचा व्यवहार केला की तो नेहमी गहाणाचाच व्यवहार असतो '' या वाक्याचा तुंम्हाला समजलेला अर्थ सविस्तर सांगा.

c) Discuss the various modes in which the lease stands determined.

क) भाडेपट्याची समाप्ती ज्या विविध प्रकारांनी होते त्यांची चर्चा करा.

---

RYM

# 2011

२०११

## PAPER - II

पेपर क्रमांक : २

## Indian Penal Code, Evidence Act, Code of Criminal Procedure, Essay on Current Legal Topic

## इंडियन पिनल कोड, एव्हीडन्स अॅक्ट, कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर, करंट लिगल टॉपिकवरील निबंध

**Time : 3 Hours** | **Max. Marks : 100**

**वेळ : ३ तास** | **गुण : १००**

SEAL

**Note :**

**सूचना :**

*(1) Question Nos. 9 and 10 are* ***compulsory.***

*(१) प्रश्न क्रमांक ९ व १० अनिवार्य आहेत.*

*(2) Answer* ***any six*** *from the remaining questions.*

*(२) उर्वरित प्रश्नांमधून कोणतेही* ***सहा*** *प्रश्न सोडवावेत.*

*(3) Marks to* ***each*** *question are indicated by figure in the margin on the* ***right*** *hand side.*

*(३) प्रश्नासमोरील उजव्या बाजूच्या समासातील अंक गुण दर्शवितात.*

*(4) Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Excess responses shall be ignored.*

*(४) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित अतिरिक्त ठरणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(5) Do not reproduce any question. Write only question's number against the answer.*

*(५) उत्तरपुस्तिकेमध्ये प्रश्न पुन्हा लिहू नयेत. फक्त प्रश्न क्रमांक नमूद करुन उत्तर लिहावे.*

*(6) "Other than cited cases, candidate should not write roll number, any names (including their own), signature, address or any indication of their identity anywhere inside the answer book otherwise he will be penalised".*

*(६) उदाहरणदाखल दिलेल्या प्रकरणांशिवाय उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वतःचे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये. अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

*(7) **English** version of the question shall be authentic in case of any ambiguity.*

*(७) कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, **इंग्रजी** भाषांतर अधिकृत समजले जाईल.*

*(8) **All** questions can be attempted only in one language either in English or in Marathi as per the option given in the application form.*

*(८) उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार **सर्व** प्रश्नांची उत्तरे मराठी किंवा इंग्रजी यापैकी एकाच भाषेत लिहिली पाहिजेत.*

---

1. Explain procedure regarding trial of a warrant case on police report and otherwise than on police report by magistrates. 10

१. पोलीसानी दाखल केलेल्या दोषारोप पत्रावरून व खाजगी फिर्यादीवरून दाखल झालेल्या वारंट खटल्याच्या संपरीक्षेसाठी न्यायदंडाधिकाऱ्यानी अंगिकारणेची पद्धत स्पष्ट करा. १०

---

2. Explain provisions regarding disposal of property in a criminal case right from investigation into a crime till conclusion trial. 10

२. फौजदारी खटल्यातील गुन्हयातील पोलीस तपासापासून त्या खटल्याचा निकाल होईपर्यंत त्यातील मुद्देमाल विल्हेवाटी संबंधीच्या तरतुदी स्पष्ट करा. १०

---

3. Write notes on **any two** :

३. कोणत्याही **दोन** टीपा लिहा :

(a) Forfeiture of maintenance right by a wife. 5

(अ) पत्नीचा पोटगीचा अधिकार गमावणे. ५

(b) Police custody and magisterial custody. 5

(ब) पोलीस ताबा व न्यायालयीन ताबा. ५

(c) First information report and complaint. 5

(क) पहिली खबर व खाजगी फिर्याद. ५

(d) Bailable and Non-bailable offences under the Indian Penal Code and other laws. 5

(ड) भारतीय दंड संहिता व अन्य कायद्यातील जामीनपात्र व अजामीनपात्र अपराध. ५

4. Explain Theft, Extortion and Robbery. When is Theft a Robbery ? When is Extortion a Robbery ? 10

४. चोरी, बलादग्रहण व जबरी चोरी स्पष्ट करा. चोरी ही जबरी चोरी केव्हा होते ? बलादग्रहण ही जबरी चोरी केव्हा होते ? १०

---

5. Write notes on **any two** :

५. कोणत्याही **दोन** टीपा लिहा :

(a) Mischief. 5

(अ) आगळीक. ५

(b) Wrongful restraint and Wrongful confinement. 5

(ब) गैर निरोध व गैर परिरोध. ५

(c) Hurt and Grievous hurt. 5

(क) दुखापत व जबर दुखापत. ५

(d) Criminal trespass and House trespass. 5

(ड) फौजदारीपात्र अतिक्रमण व गृह अतिक्रमण. ५

---

6. Write notes on **any two** :

६. कोणत्याही दोन टीपा लिहा :

(a) Proved, Disproved and Not Proved. 5

(अ) शाबीत, नाशाबीत व बिनशाबीत. ५

(b) Opinion of experts. 5

(ब) तज्ञांची मते. ५

(c) Direct oral evidence. 5

(क) प्रत्यक्ष तोंडी पुरावा. ५

(d) Fact-in-issue and relevant fact. 5

(ड) वाद तथ्ये व संबंधित तथ्ये. ५

---

7. Explain "contradiction" and "corroboration" and their use in evidence. 10

७. "कथन-विरोध" व "परिपुष्टी" व त्यांचा पुराव्यात उपयोग स्पष्ट लिहा. १०

8. Explain order of examinations of witnesses and whether a witness not examined-in-chief is allowed to be cross-examined by an adverse party. **10**

८. साक्षीदार तपासण्यांचा क्रम व सरतपासणी न घेतलेल्या साक्षीदाराची उलट तपासणी घेणेची परवानगी विरुद्ध पक्षाला दिली जाते काय हे स्पष्ट करा. १०

---

9. Write an essay on **any one** : **20**

९. कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : २०

(a) Mediation.

(अ) मध्यस्थी.

(b) Right to Information.

(ब) माहितीचा अधिकार.

(c) Human Rights.

(क) मानवाधिकार.

SEAL

---

10. Write judgement on following alleged facts : **20**

Accused No. 1 to 3 are husband, father-in-law and mother-in-law respectively of Archana. Two years after her marriage, they all started taunting her alleging that she was of evil luck as one year after her marriage, her husband's unmarried younger brother died of heart-attack; her husband lost his job and she was incapable to conceive a child. This led her to frustration and mental agony. She, therefore, thought to end her life. She narrated all incidents to her parents. On her report police registered crime and recorded statements of her parents and neighbour of the accused. Police presented chargesheet against all the accused.

At the trial, Archana and her parents were examined. They deposed the incidents as they were. However a neighbour of the accused turned hostile. Defence of all the accused is of total denial.

१०. खालील कथित तथ्यांवर आधारीत न्यायनिर्णय लिहा : २०

आरोपी क्र. १ ते ३ हे अर्चनाचे अनुक्रमे पति, सासरे व सासू आहेत. तिच्या विवाहाच्या दोन वर्षानंतर ते सर्व तिला टोमणे मारू लागले की, ती काळ्या पायाची आहे, कारण तिच्या विवाहाच्या एक वर्षानंतर तिच्या पतिचा अविवाहीत लहान भाऊ हृदयरोगाने मरण पावला; तिच्या पतिची नोकरी गेली व ती मुल होण्यास असमर्थ आहे. त्यामुळे तिला नैराश्य आले व मानसिक यातना झाल्या. म्हणून तिने आपले जीवन संपविण्याचा विचार केला. तिने सर्व घटना तिच्या आईवडिलांना सांगितल्या. तिच्या खबरीवरून पोलीसानी अपराध दाखल केला आणि तिच्या आईवडिलांचा व आरोपींच्या शेजाऱ्याचे जबाब घेतले. पोलीसानी सर्व आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

संपरीक्षेची वेळी अर्चना व तिच्या आईवडिलांना साक्षीदार म्हणून तपासले. त्यानी घटना जशा घडल्या तसे सांगितले. परंतु आरोपींचा शेजारी फितूर झाला. संपूर्ण नकारात्मक आरोपींचा बचाव आहे.